भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2016-17/257
डीपीएसएस.सीओ.सीएचडी.क्र./2695/03.01.03/2016-17 मार्च 25, 2017

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (प्रादेशिक ग्रामीण बँकांसह)/नागरी सहकारी बँका/
राज्य सहकारी बँका/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका/स्थानिक वित्तीय बँका

**मार्च 25, 2017 ते एप्रिल 1, 2017 दरम्यान सर्व दिवशी प्रदान प्रणाली सुरु राहणार**

'मार्च 30 व 31, 2017 रोजी विशेष समाशोधन कार्यकृती' वरील आमची परिपत्रके डीपीएसएस. सीओ. सीएचडी. क्र./2656/03.01.03/2016-17 दि. मार्च 23, 2017 आणि 'मार्च 25, 2017 ते एप्रिल 1, 2017 दरम्यानच्या सर्व दिवशी, सर्व एजन्सी बँका जनतेसाठी सुरु राहणार वरील' परिपत्रक डीबीआर.क्र.एलईजी.बीसी.55/09.07.005/2016-17 दि. मार्च 24, 2017 चा संदर्भ घेण्यात यावा.

विद्यमान आर्थिक वर्षासाठीच्या (2016-17) सर्व सरकारी व्यवहारांचे लेखा कर्म, मार्च 31, 2017 पर्यंत पूर्ण करण्यासाठी असे ठरविण्यात आले आहे की, आरटीजीएस व एनईएफटीसह सर्व प्रदान प्रणाली, मार्च 25, 2017 ते एप्रिल 1, 2017 दरम्यान (शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवसासह) कामकाजाच्या सामान्य दिवसांप्रमाणेच कार्यरत असतील. ह्याशिवाय, केंद्रीकृत प्रदान प्रणालींसाठीचे (उदा. आरटीजीएस व एनईएफटी) विस्तारित कालावधीही मार्च 30 आणि 31, 2017 रोजी, एका रेडियो संदेशाद्वारे सभासद बँकांना कळविण्यात आले आहे.

आपली विश्वासु,

(नंदा एस. दवे)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक